RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शेतमजुरांच्या समस्या व अपेक्षा

**कु.सुलभा सुभाषचंद्र तांबडे,** डॉ.पतंगराव कदम,महा.सांगली.

**सार**

*शेतमजूर हा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या आणि खेडे विभागातील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. पण या महत्वपूर्ण घटकाला गेलाय कांही वर्षापासून आपल्या कुटुंबाच्या मुलभूत गरजा देखील पूर्ण करता येईनात. हा शेतमजूर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मजुरीवर करत असतो. पण सध्याच्या दुष्काळग्रस्त परिस्थितीत मजुरी म्हटल की मजुरांच्य डोळ्यात अश्रू गळू लागतात. कारण दुष्काल्साद्दष्य परिस्थितीमुळे हाताला काम नाही आणि काम नसल्यामुळे खायला पोटभर अन्न मिळत नाही. अशी विचित्र अवस्था निर्माण झाली आहे. याला शेतमजूर, नैसर्गिक पर्यावरण, यांत्रिकीकरण, क्षारपड जमिनी, औद्योगिकरण व शेतमजुराच्या वाढत्या अपेक्षा या सर्वच गोष्टी जबाबदार आहेत.*

**कठीण शब्द:** शेतमजूर, दुष्काळग्रस्त, मजुरी, क्षारपड जमीन इ .

**उद्देश**:

कृषी अर्थव्यव्स्थेचा आधारस्तंभ शेतकरी व ज्याच्यावाचून शेतकरी कोणतेच काम करू शकत नाही असा त्याचा कायमस्वरूपी मदतनीस म्हणजे शेतमजूर, असे हे दोनही कृषी अर्थव्यवस्थेतील म्हहत्त्वाचे घटक असूनहि एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्म्हतेचा गंभीर प्रश्न तर दुसरीकडे शेतमजुरांच्या असणाऱ्या समस्या. या समस्या कांही प्रमाणात शासनाने प्रयन्त केलेला आहे. पण तितके यश आल्यचे दिसत नाही. तसेच या शेतमजुरांच्या अपेक्षांकडे दुलर्क्ष करून चालणार नाही.तेंव्हा या शेतमजुरांच्या सोडविणे व त्यांच्या अपेक्षा काय आहेत त्या समजून घेणे हि सर्वाचीच जबाबदारी आहे.

**अभ्यास पद्धती:**

क्षेत्रकाम पद्धती, निरीक्षण,संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, इंटरनेट, वेबसाईट.

**प्रस्तावना:**

**शेतमजूर कोणाला म्हणावे ?**

उपजीविकेचे साधन म्हणून दुसऱ्याच्या शेतजमिनीवर राबणाऱ्या मजुराला शेतमजूर असे म्हणतात. नियोजन मंडळाच्या मते, “शेतमजुराचा प्रश्न म्हणजे एक नि:संदिग्ध आव्हानच आहे आणि ह्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे उत्तरदायीत्व संपूर्ण समाजावर आहे.” शेतमजूर कोणाला म्हणावे ह्याबाबतीत पुढील काही अटी सांगता येतील.[१]

१) शेतमजूर दुसऱ्याच्या शेतजमिनीवर उपजीविकेचे साधन मिळविण्याच्या उद्देशाने काम करतो .
२) तो जिथे काम करतो त्या जमिनीवर त्याचा मालकी अधिकार मुळीच नसतो.
३) शेतीमध्ये तो जी कामे करतो त्या कामासंबंधीचे निर्णय तो स्वत: घेत नाही.
४) परिश्रमातून त्याला मिळणारा मोबदला हा फक्तं मजुरीच्याच स्वरुपात असतो, लाभाच्या स्वरुपात नाही.

दिवसेंदिवस कृषी क्षेत्रातील शेतीच्या समस्या वाढतच आहेत. बेभरवशाची नैसर्गिक शेती, कर्जबाजारीपणाची समस्या, शेतमालास उत्पादन खर्चाशी निगडीत भव न मिळण, तंत्रज्ञान व विस्तार याचा अभाव यामुळे आहे ती शेती दरवर्षी वहीती खाली ठेवणे शेतकर्यांना अवघड ठरत आहे. कांही नगदी पिके घेणारा (ऊस, केळी, फळे) शेतकरी वर्ग व परिसर सोडल्यास निव्वळ कोरडवाहू पावसाच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पाण्यावर सर्वस्वी अवलंबून असणारी शेती कसण्यासाठी फारशी आर्थिक ताकद लावू शकत नाही हि वस्तुस्थिती महाराष्ट्रतील काही भागात दिसून येते. कारण हा भाग आवर्षणप्रवण येतो. या आवर्षप्रवण भागात शेतकरी व शेतमजुर यांची अवस्था तर अधिकचं बिकट आहे. पावसाळ्यात कांही प्रमाणात काम मिळाले तरी इतर काळात हंगामी रोजगारासाठी भटकावे लागते.अशा दुष्काळी भागातून अनेक वर्षे ऊस तोडणी कामगार हंगामी स्थलांतर करत असतात. अशा मजूर वर्गातील नवी पिढी जगण्यासाठी वेगळे मार्ग अवलंबते. शेतमजूर आता शेतीकामाशिवाय इतर कामाकडे वळत असल्याचे दिसते. आगामी काळात तर शेतमजूर उपलब्ध होणेही अवघड होईल कि काय, अशीच आजची स्थिती आहे.

पावसाचे अनिश्चित प्रमाण, हमखास सिचनाची अत्यंत कमतरता यामुळे शेतीमध्ये भाडवल गुतवणूक शेतमालकाना परवडत नाही. पूर्वी उत्तम शेती, मध्यम आरोग्य, कनिष्ठ नोकरी असे सूत्र होते, परंतू वरील समस्येमुळे अलीकडे शेतकरी अनेक समस्यांमध्ये अडकला आहे. त्यामुळे वरील सूत्र उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, कनिष्ठ शेती असे उलटे झाले आहे. कारण आजपर्यंत शालेय शिकक्षणापासून पदवीपर्यंत ‘’माझी शेती’’किंवा ‘’शेतीबद्दल आस्था’’ हा संस्कारच झाला नाही. शेती शिक्षण फक्त नोकरी मिळविण्यापुरते मर्यादित राहिले आहे.राबणे, कष्ट करणेहि भावना लोप पावली आहे. आज ग्रामीण भागात प्रत्यक्ष शेती करणारी ठरविक सख्या सोडली तर शेतमालक बाधावरूनच शेती करताना दिसतात.शहरी औद्योगिकरण व शासनाच्या कांही योजनांमुळे शेतीकामाब्द्द्ल शेतमजूर अनास्था निर्माण झाली आहे. महाराष्ट्राचा विचार करता शेती उत्पनात विविध प्रकारे चढ उतार दिसून येतात. कांही ठिकाणी भाजीपाला, फळे याची परदेशात निर्यात करण्यापर्यंत शेतीमध्ये नवतंत्र वापरले जाते. तर दुसरीकडे खर्चाशी सबाधीत उत्पन्नही मिळत नाही. शेत मालाला वाजवी भाव न मिळाल्यास शेतीचा उत्पादन खर्च परवडत नाही, त्यातच शेतमजुरी वाढल्याने त्या उत्पादन खर्च वाढला आहे.

शेतकऱ्यापुढे नैसर्गिक व अनैसर्गिक अशा दोन प्रकारच्या समस्या नेहमी असतात. नैसर्गिक समस्यांवर कांही अंशी मात करण शक्य आहे. परंतु अनैसर्गिक समस्या उदा.शेतमजुरांची, भांडवल व तत्रज्ञान, आधुनिकतेची समस्या सोडविणे शक्य आहे. शेतमजुराच्य समस्या सोडविण्यासाठी सशोधनाने शेतकरी यात्रिक पद्धतीने शेती करण्याच्या प्रयतत्नात आहे.शेती मधील बरीचशी कामे यात्रिक पद्धतीने होत असल्याने निव्वळ शेतमजुरावर अवलबून राहण्याची जमीन धारणा क्षेत्र जास्त असणाऱ्या व भाडवलदार शेतकर्यांना फारशी गरज पडत नाही, परंतु अल्प भूधारक शेतकर्यांना सपूर्ण शेती यांत्रिकीकरण करणे शक्य नाही. कारण आर्थिक क्षमता कमी असते. गावाच्या, शहराच्या लगत औद्योगिक विकास महामंडळ वसाहती स्थापन झाल्यामुळे कुशल-अकुशल कामगारांना या कारखान्यात तुलनेने जास्ती वेतन मिळू लागले. शेतीत कष्ट करूनही कमी मजुरी मिळत असल्याने शेतमजूर शहरी भागाकडे आकर्षित झाल्याने त्याने शेतीकडे पाठ फिरविली.शिवाय स्वस्त धान्य दुकानात दर महा मिळणारे कमी दरातील धान्य यामुळे शेतमजुराला कामाची गरज वाटेना.

**शेतमजुराची सख्या** :

प्रत्येक देशात शेतमजुराचा एक स्वतंत्र वर्ग असून इतर मजुरापेक्षा ह्या वर्गाची वैशिष्ट्ये भिन्न असतात. उद्योग प्रधान देशाच्या तुलनेत भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात शेतमजुराचा वर्ग मोठा असणे स्वभाविक आहे. शेतमजुराची सख्या हि त्या देशाची लोकसंख्या, शेतीवर अवलबून असणाऱ्या लोकसंख्येचा भाग, शेतीची स्थिती, यत्राचा वापर, ग्रामीण भागात उपलब्ध

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

असणाऱ्या रोजगाराच्य सधी व नागरीकरणाची प्रक्रिया अशा अने गोष्टीवर अवलबून असते. विविध समित्याच्या अहवालानुसार ,१९६० सालच्या दुसऱ्या कृषी मजूर चौकशी नुसार ८५ % ग्रामीण मजूर हे आकस्मिक स्वरूपाचा असून ते ज्या शेतकऱ्याकडे काम मिळेल त्याच्याकडे काम करायला तयार असतात.फक्त १५ % शेतमजूर विशिष्ट जमीन माल्कासाठीच काम करतात. अर्ध्या मजुरा जवळ काम नसते. इतर शेतमजुराची जमीनही अतिशय थोडी असते. शेतमजुरापैकी अनुसूचित जाती-जमातीचे असतात.१९९१ च्या राष्ट्रीय आयोगानुसार १९८७-८८ साली १०८.४ दश लक्ष ग्रामीण कुटुंब,४३ दश लक्ष कुटुंब,ग्रामीण मजुराची म्हणजेच सीमात शेतकरी दिवसेंदिवस भूमिहीन होत आहे. योजनाकाळात सिचन, ट्यूबविहिरी,खते यावर करण्यात आलेले करोडो रुपये खर्चाचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांचा मिळाला. लहान शेतकरी कोरडवाहूच राहिला.

**शेतमजुराच्या सख्येत वाढ का होत आहे ?**

१) लोकसंख्येत होणरी वाढ.
२) औद्योगिकरणच्या मद गतीमुळे शेतीवर अवलबून असणाऱ्या व्यक्तीच्या सख्येत झालेली वाढ.
३) ग्रामीण उद्योगाचे अध;पतन व पर्यायी रोजगार सधीचा अभाव.
४) शेतीचे तुकडीकरण .
५) गरीब शेतकर्याचा कर्जबाजारीपना

डॉ.राधाकमल मुखर्जी याच्यामते ,"लहान शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम करणारी प्रत्येक बाब शेतमजुराच्या सख्येत वाढ करण्यासाठी कारणीभूत ठरली आहे."४

**शेतमजूर प्रकार**

शेतमजुराजवळ जमीन आहे किवा नाही हि बाब विचारात घेऊन शेतमजुराचे भूमिधारी शेतमजूर व भूमिहीन असे दोन प्रकार पडतात.

- **भूमिधारी शेतमजूर** : ज्या शेतमजुराजवळ स्वत:च्या मालकीची जमीन असते,अशा शेतमजुरांना भूमिधारी शेतमजूर असे म्हणतात. भूमिधारी शेतमजुराजवळ जमीन असली तरी टी अगदी नगण्य असल्यामुळे त्या जमिनीवर खर्च करणे किंवा संपूर्ण लागवडीखाली आणणे शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे पर्यायाने अशा शेतमजुरांना दुसऱ्या शेतावर घाम गाळावा लागतो.
- **भूमिहीन शेतमजूर** : जमिनीवर मुळीच मालकी नसलेल्या उपजीविकीसाठी इतरांच्या जमिनीवर परिश्रम करणाऱ्या शेतमजुरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेत या व्यक्तींचे स्थान सर्वात खालचे असते.

शेतमजुरांच्या भूमिमालकांशी कामाच्या दृष्टीने जो करार होतो त्यानुसार शेतमजुरांचे प्रकार पुढीलप्रमाणे :-

- **सबधित शेतमजूर** शेतमजूर शेतमालकाकडे महिन्याच्या किंवा वर्षाचा करार करून कामाला राहतात तेंव्हा अशा मजुरांना संबंधीत शेतमजूर असे म्हणतात.
- **रोजंदारी करणारे शेतमजूर :** असे शेतमजूर रोजमजुरीवर निरनिराळया शेतकऱ्यांच्या शेतामधे काम करतात.शेतकऱ्याला शेतीमधील एखादे काम उदा.नांगरणे,पालापाचोळा गोळा करणे,अशा किरकोळ कामासाठी असे मजूर उपयोगी पडतात.काम करून झाले की त्यांना ठरलेल्या दराने मजुरी दिली जाते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

लिंगभेदानुसार पुरुष मजूर व स्त्री मजूर अशी विभागणी केली जाते. अधिक अगंमेहि्नतीची कामे पुरुषंमजूर व कमी परिश्रमाची कामे स्त्री मजुरांकडून करवून घेतली जातात.

**शेतमजुरांचे शोषण-**

भारतात सुधारणा कार्यक्रम स्वांतत्र्य प्राप्तीनंतरआमंलात आला.तत्पुर्वी भारतात जमीनदारी.महालवारी,रयतवारी अशा भूधार्ण पध्दती अस्तित्वात होत्या.स्वातंत्र्यानंतर मध्यास्थ्यांचे उच्चाटन करण्यासाठी काही प्रयन्त झाले असले तरी आजही भूमीच्या बऱ्याच भागावर जमीनादारांचा अधिकार असल्याचे दिसते त्यामुळे शेती करणाऱ्या मजुरांच्रे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे.

१) महाजनांचे भांडवल व ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा भारतीय शेतीवर महाजनी भांडवलाची जबरदस्त पकड असून कर्जबाजारीपणा हा बहुंताशी छोट्या शेतकऱ्यांचे लक्षण आढळते स्वातंत्र्यापूर्वी इतर आर्थिक विकास संस्थांचा विकास न झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर महाजनांवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे त्यांच्या कडून शेतकऱ्यांचे शोषण झाले. स्वातंत्र्यानंतर सरकारातर्फे सहकारी वित्तसंस्था ,कृषी वित्तबाबत अधिकोषांची महत्वाची भूमिका असले तरी लहान शेतकरी,शेतमजूर हे कर्जासाठी महाजनांवर (सावकार) अवलंबून असल्याने कर्जाबाजारात अडकलेला शेतकऱ्यांचे सहसा सुटका होत नाही.

२) श्रमबाजाराचा दुहेरीपणा शेतमजूर आणि औद्योगिक मजूर यांना मिळणाऱ्या मजुरीमध्ये तफावत आढळते कारण शेतमजूर असंघटीत आहे तर ओधोगिक मजूर संघटित असल्याने श्रमाच्या बाजारात दुहेरीपणा आढळतो शेतमजुरांना मजूरी कमी मिळत असल्यामुळे दरडोई उत्पन्न कमी असते त्यामुळे राहणीमानाचा दर्जा निम्न असतो.

३) शेतीची अवजारे जुनी बहुतेक शेतकरी अजुनही जुन्या अवजारांचा व पारंपारिक पध्दतीचा वापर करत असल्याने उत्पादनाचे प्रमाण कमी आढळते.

४) उत्पादनातील अनिश्चितता व अस्थिरता भारतीय शेती ही मुख्यत्वे मान्सूनवर अवलंबून असल्याने आणि गेल्या काही वर्षापासून हवामानातील बदलाचा फटका शेतकरी कुटुंबाना बसत आहे.पावसातील अनिश्चितता वाढल्यास उत्पादनातील वाढ निश्चित व स्थिर असतो.

अशा कारणाने शेतमजुरांचे शोषण वाढतेच आहे या वाढत्या शोषणामुळे शेतमजुरांच्या समस्याही वाढत आहेत.शेतमजुरांच्या समस्या पुढीलप्रमाणे

१) सामाजिक दर्जा बहुतांशी शेतमजूर हे दलित समाजाचे असून त्यांचेकडे पिढ्यानपिढ्या दुर्लक्ष झालेले आसल्याने हे लोक सामाजिकदृष्ट्या अपंग असून त्यांना स्वतः चे स्थान समाजात निर्माण करण्याचे धैर्य झाले नाही.

२) असंघटित वर्ग-शेतमजूर अशिक्षित अज्ञानी असून ते अनेक खेड्यांमध्ये विस्कटलेले आहेत त्यामुळे त्यांची संघटना बांधणे कठीण आहे शहरी भागात कामगारांची संघटना उभारणे सोपे जाते आणि राजकीय पक्षानाही कामगार संघटनांच्या कारभारात लक्ष घालणे सोयीचे आणि फायद्याचे वाटते यामुळे असंघटित शेतमजुरांना जमीन मालकांशी चर्चा करून योग्य वेतन मिळविणे कठिण झाले आहे.

३) हंगामी रोजगार सरासरी शेतमजुराला वर्षाकाठी फक्त २०० दिवस काम मिळते आणि बाकीचे दैव्स तो बेकार असतो अर्ध बेकारी आणि बेकारी यामुळे भारतातील शेतमजुरांना अत्यंत कमी उत्पन्न मिळत असल्याने आर्थिक स्थिती लाखाची आढळते.

४) मजुरीची अल्प दर काम करण्याची परिस्थिती,कामाचा अवधी व कामाचे स्वरूप ह्या सर्वांचा विचार करता शेतमजुरांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून मिळणारी मजुरी अल्प असते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

५) ग्रामीण उद्योगांचा नाश ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास झाल्यामुळे आणि सरकारकडून ग्रामीण भागात सुरु करण्यात येणारी सर्व कामे हंगामी असल्यामुळे शेतमजुरांना बिगर शेती व्यवसायात पुरेसा रोजगार मिळू शकत नाही.

६) शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तिंच्या संख्येत वाढ ग्रामीण विभागात राहणाऱ्या लोकसंख्येमध्ये वेगाने वाढ होत असल्याने शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे.त्यामुळे शेतमजुरांच्या मागणीपेक्षा मजुरांचा पुरवठा इतका जास्त झाला आहे की,मजुरीचा दर अल्प असूनही एखादे काम करण्याकरिता अनेक मजुर तयार होतात.

७) निरक्षरता अज्ञान अलीकडील काही वर्गात शिक्षणाचा प्रसार झाला असला तर ते शिक्षण बऱ्याचदा अर्धवट किंबहुना कारकुन कीशी संबंधित दिसते पण पूर्वी तर शेतमजुरांचा शिक्षणाशी संबध म्हणजे जवळ जवळ दुरापास्तच.आजही शेतमजुर मध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळते. त्यामुळे प्राप्त परिस्थिती मध्ये समाधान मानणे ही दैववादी वृत्ती मोठ्या प्रमाणात आढळून येते.

८) शेतमजुरांच्या प्रश्नाकडे नियोजन मंडळाने केलेले दुर्लक्ष दोन शेतमजुर चौकशी समितीनी सदर केलेल्या अहवालामुळे भारतातील शेतमजुरांची जगणे किती दयनीय आहे हे गोष्ट प्रकाशात आला असूनही नियोजन मंडळाने आजवर कोणत्याही योजनेत ह्या प्रश्नांचा गांभीर्याने विचार केलेला नाही ग्रामीण जीवनात शेतमजुराचे स्थान सर्वात खालचे असल्यामुळे सामुदायिक विकास योजनांचा फायदा झीरापाण्याच्या पप्रक्रियेनुसार शेतमाजुरापर्यंत कधीच पोहचत नाही शिवाय शेतमजूर ही संघटित व जागरूक नसल्यामुळे किंवा त्यांचा असंतोष विस्फोताच्या बिंदू पर्यंत अजुनही पोहचलेला नसल्यामुळे नियोजन मंडळाने शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीकडे लक्ष दिलेलं दिसत नाही.

९ ) मोठ्या शेतकऱ्यांनी केलेला विरोध : मजुराला मिळणार्या मजुरीत वाढ झाल्यास आपला लाभ कमी होईल या भीतीने शेतकऱ्यानि विरोध केला.

शेतमजुरांची मजुरी :कामगार आणि कारखानदार याच्यांत झालेल्या करारानुसार कामगारांना मिळणारे मौद्रीक शोधन म्हणजे मजुरी होय.४ अशी सर्वसाधारण मजुरीची व्याख्या केली जाते. बऱ्याच उद्योगामध्ये कामगारांना मिळणाऱ्या मजुरीत मुलभूत गरजा देखील भागत नसल्याने स्वभाविकच कामगारांची कार्यक्षमता निन्म दर्जाची,दारिद्र्य व असंतोषामधुन निरनिराळे तणाव होऊन औद्योगिक शांतीचा भंग होणे हे आलेच.हे दुष्परिणाम टाळण्यासाठी न्यूनतम मजुरीचा विचार पुढे आला.

'न्यूनतम मजुरी म्हणजे कामगारांना दिल्या जाणाऱ्या मजुरीची किमान मर्यादा होय.'६

न्यूनतम किंवा किमान मजुरीचा कायदा शेतकऱ्यांना लागू करावा कि नाही या चर्चेनंतर किमान मजुरी कायदा शेतीमध्ये सुरवातीला काही विशिष्ट क्षेत्रात आणि तेही विशिष्टे मर्यादेपेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या शेतकऱ्यांनालागू करण्यात आला.या निर्णयानुसार केंद्रसरकारने केंद्रशासित प्रदेशात आणि राज्यसरकारने आपापल्या राज्यात किमान मजुरी दर ठरवला.

शेतमजुरांसाठी शासनाने केलेल्याउपायोजना; भारतातील शेतमजुरांना आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून देण्याकरीताव त्यांच्या जीवनात सुधरणा घडवून आणणे यासाठी सरकारी पातळीवरूनकेले जाणारे प्रयन्त पुढीलप्रमाणे

१ भारतीय घटना- भारतीय घटनेनुसार गुलामगिरीची प्रथा राबविणे हा गुन्हा आहे.घटनेनुसार वेठबिगारी नष्ट करण्यात आली.आहे.

२ ग्रामीण उद्योगांचा विकास - ग्रामीण भारतीय शेतमजुरांची आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी ग्रामीण उद्योगांची घडवून आणणे.

३ मजुरांच्या सहकारी संस्था - या संस्थे मार्फत रस्ते बाधणी ,कालवे,तलाव,वनीकरण अशा सरकारी ठेके देण्यात येतात . यामुळे मजुरांना हंगामाव्यतिरिक्त काम मिळते

**शेतमजुरांच्या मुलभूत अपेक्षा**

१ शेती,सिचन, वीज, विज्ञान या पायाभूत सुविधा यावर सरकारची सार्वजनिक गुतवणूक लक्षणीय प्रमाणात वाढवून शेतीतील उत्पादन व उत्पादकतेत मोठी वाढ करावी.शेतीवरील अनुदाने वाढवावीत.

२ सर्व शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर भाव द्यावा .आणि या भावाने शेतमालाची खरेदी करणारी यत्रणा उभारावी.

३ पतपुरवठा सुविधात मोठी वाढ रवी.शेतमजुरांना ४%व्याज दराने कर्ज द्यावीत.नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना कर्ज माफ करावे.

४ पिक विमा योजनेचा मोठा विस्तार करून ती सपूर्ण देशतील सर्व पिकांना लागू करावी.

५ परदेशी शेतमालावर पुन्हा सख्यात्म्क निर्बंधघालण्यासाठी जागतिक व्यापार सघटनेतील इतर विकसनशील देशांना सघटीत करून आपले राष्ट्रीय हित सघटीत ठेऊन परदेशी शेतमालावरील आयात कराचे प्रमाण निश्चित असावे.

**समारोप** :

विकासाबरोबर विकृती येतेच.कारण रासायनिक खते आणि जलसंपदा आली तशी क्षारपड जमीन क्षेत्र वाढले.हा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

किमान वेतन कायदा शेतमजुरा पर्यत पोहचवणे.

शेतीच्या तुकडीकरनाचे तोटे समजावणे.

आधुनिक शेती तंत्र समजावणे.

**संदर्भ सूची :**

१ श्रमाचे अर्थशास्त्र ,प्रभाकर देशमुख तिसरी आवृत्ती२००६ ,पृ.३१६

२१ श्रमाचे अर्थशास्त्र , प्रभाकर देशमुख तिसरी आवृत्ती२००६,पृ.३१७

३ भारतीय अर्थव्यवस्था (,संक्रमण आणि विकास) हीमालया पब्लिशिंग हाउस पृ.२२३

४,५,६, श्रमाचे अर्थशास्त्र , प्रभाकर देशमुख, तिसरी आवृत्ती२००६, पृ.३१८,३२०

भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणत्म्क अर्थशास्त्र,पिपळापुरे पब्लिशर्स,५ वि .आवृत्ती२०१० , डॉ.जि. एम.झामरे

ग्रामीण विकासाच्या नव्या दिशा ,तेजस पब्लिकेशन,प्र.आवृत्ती२०१५,प्रा. डॉ.वसंतराव जुगळे

बेकारी निर्मूलनातून ग्रामविकास ,संपादक-वि.सं.पागे (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई १९८९ )

महाराष्ट्रातील आणि शेतकरी अभिनंदन प्रकाशन,प्र.आ.२००७,शांताराम बोकील

अॅग्रोवन पेपर २०१४ ते २०१६

www.google.com.